# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

## परिपत्रक

Estd: 1962
"A++" Accredited by NAAC (2021)
with CGPA 3.52

जा.क्र.सीडीओई/ ७५ दि. 24 FEB 2026

**विषय : -** मार्च/एप्रिल २०२६ उन्हाळी सत्रामध्ये होणाऱ्या परीक्षेसाठी परीक्षा अर्ज भरणेच्या मुदतवाढ तारखेबाबत.

**संदर्भ :** १. शिवाजी वि./परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी./६९ दि.२१.०२.२०२६ रोजीचे पत्र.
२. शिवाजी वि./परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी./४८ दि.०५.०२.२०२६ रोजीचे पत्र.
३. शिवाजी वि./परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी./४९ दि.०५.०२.२०२६ रोजीचे पत्र.

परीक्षा नियुक्ती विभागामार्फत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील मार्च/एप्रिल २०२६ उन्हाळी सत्रातील होणाऱ्या परीक्षेसाठी परीक्षा अर्ज स्विकारणेच्या तारखा, परीक्षा शुल्क व परीक्षा अर्ज सादर करणेच्या तारखा व परीक्षेच्या संभाव्य तारखेबाबत उपरोक्त संदर्भ क्र. २ व ३ नुसार परीक्षक नियुक्ती विभागाने यापूर्वी कळविलेले आहे. याबाबत सदरची परिपत्रके आपणास अवगत करणेत आलेली आहेत. परीक्षा अर्ज व तदअनुषंगिक कामकाजाच्या अनुशंगाने दि.१८.०२.२०२६ रोजी अभ्यासकेंद्रासाठी ऑनलाईन बैठक आयोजित करणेत आली होती. या बैठकीवेळी याबाबतची आवश्यक ती माहिती आपणास अवगत करणेत आलेली आहे. परीक्षा विभागामार्फत अभ्यासक्रमांचे विविध अभ्यासक्रमांचे निकाल यापूर्वी जाहिर झालेले आहेत. त्यानुसार खालीलप्रमाणे आपल्या केंद्रामार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१. आपल्या केंद्रावरील प्रवेशित विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज भरणेच्या मुदतवाढीबाबत सदरचे परिपत्रक व त्यामधील सूचना निदर्शनास आणाव्यात.
२. सोबतच्या संदर्भिय परिपत्रकामध्ये उल्लेखित तारखा, परीक्षा शुल्क व अन्य तपशीलाप्रमाणे सर्वअनुषंगिक बाबींची पूर्तता करणेबाबत आपल्या केंद्रामधील प्रवेशित विद्यार्थ्यांना विविध माध्यामतून अवगत करावयात. तसेच सोबत परीक्षक नियुक्ती विभागाची संदर्भिय परिपत्रके जोडली आहेत.
३. दूरशिक्षण केंद्राकडील विद्यार्थ्यांचे प्रवेश व परीक्षा अर्ज स्वतंत्र भरणेत येत असून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी विहित मुदतीत परीक्षा अर्ज व शुल्क भरणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज व शुल्क कार्यवाही वेळेत न सादर केल्यास परीक्षा अर्ज विद्यार्थ्यांना परीक्षेस बसता येणार नाही, याची नोंद घ्यावी.
४. या केंद्राचे परिपत्रक व संदर्भिय परिपत्रके आपल्या केंद्राच्या सूचनाफलकावर तसेच ऑनलाईन नोटीसवर प्रसिध्द करावे.

Bhinde

**उपकुलसचिव**

प्रति,

सर्व केंद्रप्रमुख/केंद्रसंयोजक दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

प्रत : -

१. मा. संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
२. उपकुलसचिव, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
३. सहांय्यक कुलसचिव, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
४. कक्ष अधिकारी/ऑफीस सुपरवायझर कम डाटा एन्ट्री प्रोसेसेर दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
५. सर्व संबधित समन्वयक व हंगामी सहाय्यक प्राध्यापक : - जरूर त्या योग्य त्या कार्यवाहीस्तव
६. सर्व संबंधित प्रवेश व प्रशासकीय विभागातील सेवक : - जरूर त्या योग्य त्या कार्यवाहीस्त
७. संगणक चालक : - सदरचे परीक्षा अर्ज व शुल्क ऑनलाईन पध्दतीने भरणेबाबत व इतर अनुषंगिक कार्यवाहीबाबत सर्व संबंधित विभाग व संबंधिताशी समन्वय साधून आवश्यक ती कार्यवाही वेळेत पूर्ण करून घ्यावी. याबाबत अभ्यासकेंद्राना येणाऱ्या तांत्रिक अडचणीचे निवारण वेळेत करणेबाबत मार्गदर्शन करावे.